हिंदी विषयातील शोध प्रबंधाचा चिकित्सक अभ्यास : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संदर्भात

संशोधक
वैशाली समर्थ
Email ID : vaishalibelge79@gmail.com

मार्गदर्शक
डॉ. रमनिक श्रावण लुलेनगुरे
ग्रंथपाल
रेणुका कॉलेज, बेसा, नागपूर

Crossref DOI - https://doi.org/10.5281/zenodo.23558515

सारांश :

ज्ञान विज्ञानाच्या आजच्या बदलत्या परिप्रेक्ष्यात विद्यापीठीय शिक्षणचे संदर्भात बदलु लागले आहेत पारंपारिक विद्यापीठांच्या जबाबदा—याही पुर्वीपेक्षा वेगळया आणि बाधीत झाल्या आहेत. विद्यार्थ्यानाही या विश्वव्यापी ज्ञानात माहिती तंत्रज्ञानाशी निगडित माहिती विद्यापीठ देत आहे. हिंदी विषयातील शोध प्रबंधाविषयी माहिती देण्याचा प्रयत्न प्रस्तुत पेपर मध्ये केला आहे.

किवर्ड : हिंदी शोधप्रबंध, विद्यापीठ

प्रस्तावना :

डॉ. पि.भि.कोलते महानुभाव पंथाचे महान संशोधक ताम्रपट व शिलालेखाचे गाढे अभ्यासक लिळाचरित्र ग्रंथाचे संपादक आणि मराठी साहित्य क्षेत्रातील महत्वपूर्ण व्यक्तिमत्व होते. ४ ऑगस्ट १९२३ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची स्थापना झाली. तेव्हापासून मोठया निष्ठेने विद्यापीठ उच्च शिक्षण प्रसाराचे कार्य करीत आहे. आपले विद्यापीठ मध्य भारतातील सर्वात जुने विद्यापीठ आहे. केवळ कला, विज्ञान, विधी आणि शिक्षण या चार विद्याशाखा, नागपूर, जबलपूर आणि अमरावती येथील सहा महाविद्यालयाचे व त्यात शिकणारे ९१७ विद्यार्थी यांनी सुरु झालेल्या या विद्यापीठाचा आजचा विशाल विस्तार सर्वाना स्तिमित करणारा आहे.

हिंदी आंतरराष्ट्रीय भाषा :

प्राचीन काळामध्ये भारताची भाषा संस्कृत होती. सुरवातीला प्राचीन ग्रंथाची रचना ही संस्कृत भाषेमध्ये असायची संस्कृत भाषा ज्या प्रकारे देववाणी होती त्याचप्रमाणे धर्म भाषा, कामकाजात देखील संस्कृत भाषे चा जास्तीत जास्त वापर केला जायचा. बौधीक काळात अशोक राजा महान सम्राट यांच्या राज्यामध्ये भारताची राजभाषाचे शिक्षण पाली व प्राकृत भाषेमध्ये शिक्षणाचे धडे दिले जायचे.

काळ जसा जसा बदलत गेला तस तसा भारतामध्ये मुसलमानाचे शासन आले. या कालखंडामध्ये प्राकृत भाषेनंतर मराठी, हिंदी गुजराथी, बंगला, कन्नड आदि भाषा उत्पन्न झाल्या. या भाषेमध्ये साधुसंतानी

उच्च कोटी प्रमाणात साहित्याचे निर्माण व विकास करण्यात सुरुवात केली या भाषेव्दारे प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. परंतु राष्ट्रभाषा तथा राजभाषाचे स्थान प्राप्त होउ शकले नाही. एकोणीसाव्या शतकाच्या शताब्दी च्या उत्तरार्ध भारत ब्रिटीश शासनाचा काळ आला. या काळात इंग्रजी राजभाषा बणली. लॉर्ड मैकालो यांच्या प्रयत्नानी शाळा महाविद्यालयात अंग्रजी, शिक्षणास सुरवात झाली परंतु त्याच काळात स्वतंत्र आंदोलनाची सुरुवात झाली.

राष्ट्रभाषा :

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. यामध्ये भिन्न जातीची अनेक भाषा बोली बोलली जातात. अश्या बहुभाषी देशामध्ये मातृभाषा अतिरिक्त एक संपर्क भाषेची आवश्यकता होती. केंद्रिय स्तरावर देखील राष्ट्रभाषाची आवश्यकता होती. भिन्न भिन्न भाषा बोलणारे व्यक्ति इतर भाषे प्रमाणे संपर्क स्थापित करु शकले पाहिजे व असे विचार यायला लागले आपल्या विचाराचे आदान प्रदान करु शकेल. राष्ट्रातील समस्त प्रशासनिक आणि न्यायिक शैक्षणिक, साहित्यीक, औद्योगिक वाणिज्य, वैज्ञानिक क्षेत्रात माध्यम हिंदी भाषा असेल तर राष्ट्राचा बौध्दीक विकास होण्यास मदत होईल.

उददिष्टे :

१. नागपूर विद्यापीठात हिंदी या विशयातील अभ्यासंकानी पी.एच.डी. साठी वापरलेल्या साहित्य स्त्रोतांचा अभ्यास करणे.

२. हिन्दी विशयातील वाड्:मय साहित्यातील उल्लेखांचा विशलेशणात्मक अभ्यास करणे.

३. संषोधनात जास्तीत जास्त उपयोगीलेल्या वाडमय साहित्यांना श्रेणी देणे.

४. प्रंबधामधील वाड्:मय साहित्य स्त्रोताचे स्वरुप वैषिश्टये जाणून घेणे.

संशोधन पध्दती :

- नागपूर विद्यापीठातून हिंदी विषयात आचार्य पदवी प्राप्त प्रबंध (१९८२–२०२४) मुख्य अभ्यासाचे साधन आहेत. गोळा केलेला डाटा विश्लेषीत विवरणात्मक आणि वर्गीकृत केला आहे.

विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :

नागपूर विद्यापीठाव्दारे पुरस्कृत हिंदी विषयातील शोध प्रबंधाचा अभ्यास केलेला आहे. शोधनिबंधकाच्या अभ्यासासाठी १९८२ ते २०२४ या कालावधीतील २१० पैकी ७ वर्षाचा आचार्य पदवी प्रबंधातील एकूण उल्लेखांच्या अभ्यास प्रस्तुत पेपर मध्ये केला आहे.

हिंदी साहित्यांचा अभ्यास :

साहित्य हे सृजनात्मक विद्या नसुन विवेचनात्मक आलोचनात्मक आणि समीक्षात्मक पण आहे.

साहित्यामध्ये अनेक तत्वाचा समावेश असतो साहित्याचा उद्येश प्रादेशिक भाषेचा अनुशीलन परिशीलन व्दारे व्रगवेगळया युगाची संस्कृती सभ्यता प्रस्तावित होते. इतिहासामध्ये अंतर्गत मर्यादा, परंपरा निश्चित नियम, सिध्दांत काव्य आणि कला कसोटी अनुसार रचना अनिवार्य असते.

हिंदी साहित्याचे प्रकार :

१) रासो काव्य :

रासो हे नाव वीरसात्मक काव्यांस संबोधल्या जाते रासो जातीचे पहिले काव्य युमान रासो मनिष जाते. वीराची शैर्यसुक्त वर्णन, पराक्रम, त्यांनी केलेले शत्रुकल्याहरण इ. विषयीचे हिंदीचे वांडमय याच रफपातज आहे.

भक्ति काव्य :

चौदावी शताब्दीच्या उत्तरार्धास हिंदी साहित्य भक्ती काव्याचा तीव्र गती ने बुध्दी झाली. भक्ती भावनाचा प्रसार संपुर्ण भारतीय प्रदेशात भारतीय कविंनी संस्कृतीचा विकास केला.

निबंध :

हिंदी निब्धचा विकास देखील भारतेन्दु या युगात बघायला मिळतो. हिंदी निबंधाचे पहिले आरंभकर्ता पं.सदासुखलाल नावानी 'सुखसागर' चे नाव घेतले जाते. संपुर्ण निबंध साहित्याचा श्रमिक विकासामध्ये चार युगामध्ये विभाजित केलेला आहे.

भारतेन्दु युग	—	सन १८५७ ते सन १९००
व्दिवेदी युग	—	सन १९०० ते सन १९२०
शुक्ल युग	—	सन १९२० ते सन १९४०
शुक्लोत्तर युग	—	सन १९४० पासून आतापर्यंत

उपन्यास :

हिंदी उपन्यास हि आधुनिक युगाची देन आहे. काहि आलोचनात्मक हिंदी उपन्यास हे संस्कृत पौराणिक किंवा धार्मिक कथा कांदबरी किंवा दशकुमार चरित या सारख्या काव्यमय ग्रंथाना जोडले जातात.

कहाणी :

आधुनिक हिंदी कहाणी विकासाचा इतिहास बघीतल्यास फार जुना नाही आहे. भारतातील प्राचीन कथा साहित्य, पाश्चात्य कथा साहितय बंगला कथा साहित्य एक लोककथा साहित्याचा प्रभाव हिंदी कहाणीवर देखील झालेला आहे. १९५६ मध्ये किशोरीलाल गोस्वामी की इन्दुमती नावाची प्रमय भौतिक कहाणी प्रकाशीत झालेली होती.

हिंदी कहाणी साहित्याचा इतिहास तीन काळात विभाजीत करण्यात आलेला आहे.

१) प्रसाद युग
२) प्रेमचन्द्र युग
३) नवे युग

नाटक :

भारतेन्दु हिंदी नाटकाची रचना पुर्व हिंदी मौलिक नाटय साहितयाचा आरंभ ग्रंथापासुन झालेला होतो.

नाटकाचे प्रकार

१) ऐतिहासीक नाटक
२) पौराणिक नाटक
३) काल्पणिक नाटक
४) प्रसाहोत्तर नाटक
५) अनुदित नाटक

पुस्तक :

संशोधकाना जास्तीत जास्त माहिती हि विविध प्रकारच्या पुस्तकामधुन आवश्यक अशी माहिती जमा करफन पुस्तकाचा संदर्भ देता येतेत्र

मासिके / साप्ताहिके :

मासिके साप्ताहिक मधुन राजकीय आणि शैक्षणिक क्रिडा इ. स्तरावरील माहिती प्रकाशीत होत असते.

वर्तमानपत्रे :

दैनंदिन माहिती हि आपल्याला वर्तमान पत्रातुन अग्रलेख, आर्थिक घडामोडी इ. लेख वर्तमानपत्रातुन प्रकाशित होत असते.

नियत कालिके :

विशिष्ट ठराविक कालावधीनंतर सातत्याने विशिष्ट नावाने प्रकाशीत होणारे प्रकार म्हणजे नियतकालिक होय.

वार्तापत्रे :

संशोधन क्षेत्रात चालु घडामोडी मध्ये काय सुरु आहे हे आपल्याला त्या त्या क्षेत्रात घडणा—या घटनांवर वार्तापत्र काढली जातातत्र वातापत्रे ही सज्ञानांची अतयंत गतिमान माध्यम आहे.

ज्ञानकोश :

सर्व ज्ञानाचा संग्रह विविध विषयाची माहिती ज्यात दिलेली असते अश्या ज्ञानास ज्ञानकोश म्हणतात. संपूर्ण माहिती ही अनुवर्गक्रमानुसार दिली जाते.

आत्मचरित्रे :

आत्मचरित्रे म्हणजे लेखकाने आपल्या जीवनाचे केलेले सिंहावलोकनच होय आत्मचरित्रामधुन लेखकांच्या जीवनकला संबंधीची काही उपयुक्त माहिती प्राप्त होते.

चरित्र कोश :

एखादया मनुष्याचा जन्मापासून मृत्यूपर्यंतचा कालखंडातील त्यांच्या जीवनातील घडामोडीचा कार्याचा कर्तत्वाचा लिखित इतिहास म्हणजे चरित्र कोश होय. चरित्र कोशामध्ये अनेक व्यक्तीच्या चरित्रांचा एकत्रित केलेला संग्रह होय.

पूर्वसंशोधनाचा आढावा :

कुमार प्रशान्त (२०१९) 'अशोक वाजपेयी की काव्य भाषा का अध्ययन' या प्रबंधामध्ये काव्या विषयी व हिंदी साहित्याविषयी माहिती दिली आहे.

वालदे रुपा (२०१९) पलि साहित्य मझि मनिकाय में भगवान बुध्द के नैतिक मुल्यों का सैध्दान्तिक विश्लेषन यामध्ये संशोधकाने पालि साहित्याचा जास्तीत जास्त उपयोग शोध प्रबंधामध्ये केला आहे.

बैसवारा मायावती (२०१९) 'शशिप्रभा शास्त्री के कथा साहित्य का अध्ययन' या प्रबंधात कथा साहित्याचे शशिप्रभा यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव आहे.

लिल्हारे कुंजनलाल (२०२१) हिन्दी भाषा और साहित्य के विकास में विदर्भ साहित्यिक संस्थाओ का अवदान या प्रबंधामध्ये हिंदी विषयाशी निगडीत संदर्भसुची देण्यात आलेली आहे. यामध्ये मराठी इंग्रजी संदर्भ सुची देण्यात आलेली आहे.


शोध प्रबंध :

ग्रंथालयामध्ये भव्य ग्रंथसंग्रह असून शोध प्रबंध तसेच दुर्मीळ ग्रंथसंग्रहाचा वेगळा विभाग आहे. ग्रंथालयाचा फायदा विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी संशोधक आणि इतर सभासद घेतात.

वर्षानुसार प्रबंधाची यादी			
श्रेणी क्र.	प्रबंध जमा केल्याचे वर्ष	प्रबंध संख्या	टक्केवारी

१.	१९८२	४	२२.२२
२.	१९८३	१	५.५५
३.	१९८४	२	११.११
४.	१९८५	१	५.५५
५.	१९८६	३	१६.६६
६.	१९८७	४	२२.२२
७.	१९८८	३	१६ण६६

वर्षानुसार प्रबंधाचे विश्लेषण



पुढील तक्त्याचा विचार केल्यास जास्तीत जास्त १९८२ ते १९८७ यामध्ये ४ प्रबंध – २२.२२ टक्के, १९८३ ते १९८५ यामध्ये १ प्रबंध सादर केलेले आहे. १९८६ ते १९८८ यामध्ये ३ प्रबंध सादर केलेले असून याची टक्केवारी १६.६६ टक्के तर १९८४ मध्ये २ प्रबंध सादर केलेले आहे याची टक्केवारी ११.११ टक्के आहे.

निष्कर्ष :

संपूर्ण पेपर मध्ये असा निष्कर्ष निघतो कि, हिंदी विषयातील शोधप्रबंधामध्ये हिंदी साहित्याचा

वांडमयाचा विस्तार करण्यात आलेला आहे. शोध प्रबंधाव्दारे कविता अभ्यास, कादंबरी, कहानी व्यक्तिच्या जिवनावरील संपूर्ण विवेचन करण्यात आलेले आहे. तसेच हिंदी भाषेचे महत्व याच बरोबर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ याविषयी थोडक्यात माहिती प्रस्तुत पेपर मध्ये देण्यात आलेली आहे. उद्येश देखील समाविष्ट करण्यात आलेले आहे. तक्त्याव्दारे माहिती देण्यात आलेली आहे. आचार्य पदवीचा (प्रबंधाचा) ५ वर्षीय तक्ता व १९८२ ते १९८८ या सात वर्षाचा अीयास करण्यात आलेला आहे. प्रबंधातील शिर्षकाचे विषयाचे वर्गीकरणाव्दारे तक्ता करण्यात आलेला आहे.

संदर्भ सूची :

- डॉ. तिवारी भोलानाथ (१९६२), हिन्दी भाषा किताब मील इलाहाबाद, पान नं. ५.
- डॉ. मिश्र रामेश्वर, (१९७५), राष्टभाषा हिन्दी का स्वरूप विधान भारतीय ग्रंथ निकेतन, दिल्ली,
- डॉ. मिश्र रामेश्वर, (१९५३), राष्टभाषा हिन्दी: प्रचलन और प्रसार: अनुपम प्रकाशन
- केशवदत्त वली, (१९८३), भाषा विज्ञान और हिंन्दी : लक्षमेला प्रकाशन, १९८३.
- सिंग कोमल (१९६०), : भाषा कि उत्पत्ती तथा हिंन्दी और उसकी बोलिया उमेश प्रकाशन, १९६० दिल्ली.
- पवार एस.पी इतर (२००१) ग्रंथालय व माहितीशास्त्रा कोल्हापुर फडके प्रकाशन
- नरगुंडे रेवती, (१९९६) प्रलेखन आणि माहिती शास्त्रपुणे युनिव्हर्सल प्रकाशन पान नं. ३३
- त्रिपाठी एस.एस. (१९९८) प्रलेखन एवं सुचना सेवाए तथा नेटवर्क आगरा, वाय के पब्लिकेशन पान नं. ४३५
- डॉ.धोंड श्याम मानव, ''राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ वार्षिक अहवाल २०१९ – २०'' रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर ८ जुलै २०२१